कयामतच्या दिवसी लोकं अनवाणी पायाने, नग्न शरीरासह,व खत्ना नसलेल्या

ईमानधारकांची आई माँ आईशा रजिअल्लाहु अनहा द्वारा निवेदन आहे की: मी प्रेषितांना [अल्लाह ची सलामती असो त्यांच्यावर] म्हणताना ऐकले की: <> मी प्रतिप्रश्न केला की:हे प्रेषिता [सलामती असो त्यांच्यावर] पुरुष व महिला एकासोबत ते तर एकमेकाला बघतील? प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी फरमाविले की:<>. [صحيح] [متفق عليه]

प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी कयामत च्या दिवसाची झलक सादर केली, लोकं आपा आपल्या कबरीतुन उठुन सरळ हिशेबा करता जमा केल्या जातील, अशा अवस्थेत की, अनवाणी पायाने, त्यांच्या पायामध्ये जोडे नसतील, बिल्कुल नग्न अवस्थेत शरीरावर एकही कपडा नसेल, आणी सुन्ता नसलेल्या अवस्थेत जसा आईने जन्म दिला होता, हे सर्व ऐकल्यावर मा आईशा रजिअल्ला अनहा आश्चर्य चकित होत म्हणाली: हे प्रेषिता, काय पुरुष व महिला एक दुसऱ्याला बघणार नाहीत?! त्यावर प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी समजाविले की हिशेबाच्या दिवसाची भयावहता ईतकी असेल की प्रत्येकाला आपली परिस्थिती व दुसऱ्याची गुप्तांग बघण्याची मुळीच सवळ मिळणार नाही, त्या सर्वांचं ध्यान व डोळे फक्त त्या दिवसाची भयानकता व प्रकोपा मधे मग्न असतील, कुणीही कुणाच्या गुप्तांगा कडे बघणार नाही.

http://www.sunnah.global/hadeeth/mr/show/5460